
Read India
An Imprint of Pratham Books


# टिल्लू आणि बिल्लू

अनुपा लाल
अजीत नारायण



# टिल्लू आणि बिल्लू


लेखक
अनुपा लाल




चित्र
अजीत नारायण

मराठी अनुवाद
संध्या टाकसाळे


एका जंगलात टिल्लू आणि बिल्लू नावाचे दोन जुळे ससे राहात. जंगल हिंस्त्र प्राण्यांनी भरलेलं होतं. पण या सशांनी आपल्याकरता चांगलं भक्कम घर बांधलं होतं. त्यामुळे त्यांना कसलीच भीती नव्हती आणि ते आनंदात राहात होते. कुडकुड थंडीत एका संध्याकाळी ते दोघं शेकोटी पेटवून मस्त बसले होते, तेवढ्यात दारावर जोरात थाप पडली. बाहेर मोठा लांडगा होता.




लांडगा मोठ्यानं म्हणाला, ''थंडीनं पार गारठलोय रे मी ! अगदी थोडंसं दार उघडा ना, माझी शेपटी तेवढी मी आत सरकवतो आणि उबदार करुन घेतो. मी तुम्हाला खरंच काहीही करणार नाही. शप्पथ'' टिल्लू आणि बिल्लू दयाळू होते. त्यांनी थोडंसं दार उघडलं आणि लांडग्यानं आपली शेपटी आत सरकवली.



दोन मिनिटातच तो म्हणाला,'' अहाहा! काय उबदार वाटतंय,
मला मागचे दोन पाय आत ठेवता आले तर? थोडं उघडा
ना रे दार. मी अगदी काही करणार नाही तुम्हाला.''



टिल्लूनं आणखी थोडं दार उघडलं तोवर बिल्लूनं एक मोठं पाण्यांचं पातेलं तापायला ठेवलं. पाच मिनिटांनी लांडगा म्हणाला, ''किती दयाळू आहात रे तुम्ही. आणखी थोडंसंच दार उघडलं तर माझ्या पुढच्या पायांनाही उब मिळेल. काळजी करु नका. मी अगदी सरळ मनाचा आहे, काही करणार नाही तुम्हाला.''




जुळ्या सशांनी पाण्याच्या पातेल्याकडे पाहिलं. पाणी गरम होत होतं. त्यांनी आणखी थोडं दार उघडलं. आता लांडग्याचं नाकच फक्त दाराबाहेर होतं. दहा मिनिटांनी लांडगा म्हणाला,

''किती उबदार आणि छान वाटतंय मला.
थोडं आणखी उघडा ना रे दार,
किती प्रेमळ आहात तुम्ही.
माझं नाक अजून
गार आहे. घाबरू नका,
मी अगदीच
निरुपद्रवी आहे."




टिल्लूनं आणखी थोडं दार उघडलं आणि बिल्लूनं उकळत्या पाण्याचं पातेलं उचललं.
''कर आता तुझं नाक उबदार'', टिल्लू म्हणाला.




लांडगा वळून एकदम गर्रकन फिरला आणि त्यानं सशांवर झडप घातली. पण ते तयारीतच होते. बिल्लूनं दुष्ट लांडग्यांवर थेट उकळतं पाणी टाकलं.




''ओय..ओय आई ग'' करत लांडगा दारातून बाहेर पळाला. पण जाताना ओरडला, ''मी परत येतो आणि तुमचे तुकडे तुकडे करतो की नाही ते बघाच आता.''



टिल्लू आणि बिल्लू घराच्या छपरावर चढून लपून बसले.



थोड्याच वेळात तो लांडगा आणखी दहा लांडग्यांना घेऊन आला. दार तोडून ते घरात घुसले तर घरात कुणीच नव्हतं.



बाहेर गेलेला एक लांडगा ओरडला, ''ते बघा, तिथे आहेत ते. आपण जर एकावर एक असे उभे राहून शिडी केली तर त्यांच्यापर्यंत पोचू आपण.''



लांडग्यांनी एकावर एक उभं राहायला सुरुवात केली. उकळत्या पाण्यानं भाजलेला लांडगा तळाशी होता.




ते छपरावर पोचणार इतक्यात टिल्लू ओरडला, ''बघा हं, जपून! हे आलं आणखी उकळतं पाणी.''


भाजलेला लांडगा एकदम घाबरला आणि किंचाळला, ''नाही..छे छे परत नाही आता.''



स्वतःला वाचवायला त्यानं एकदम धूम ठोकली आणि इकडे लांडग्यांची शिडी धडाधड कोसळली.



लंगडत, ओरडत आणि विव्हळत लांडगे जे परत गेले, ते पुन्हा आलेच नाहीत. टिल्लू आणि बिल्लू छपरावरून उतरले. त्यांनी दार दुरुस्त केलं आणि ते सुखानं राहू लागले.





माझं नाव सतीश. मी खूप मस्ती करतो असं सगळे म्हणतात पण मला शिक्षा होत नाही कारण मी वर्गात पहिला येतो. मी प्रथमच्या वाचनालयातली पुस्तकं वाचतो म्हणून माझा नंबर येतो असं शिक्षक म्हणतात.

तुम्ही हे पुस्तक विकत घेतल्याबद्दल मी तुमचा आभारी आहे. यामुळे माझ्या वाचनालयाला माझ्यासाठी आणि माझ्या मित्रमैत्रिणींसाठी नवीन पुस्तकं घेता येतील.

9564

अनुपा लाल १९७० पासून मुलांसाठी लिहीत आहेत. गोष्टीरूप रामायणासह त्यांची २० पुस्तकं प्रकाशित झाली आहेत. प्रेमचंद यांच्या अनेक कथांचा आणि गोदान या कादंबरीचा अनुवाद केला आहे. मुलांसाठी लिहायला त्यांना आवडतं आणि दिल्लीतल्या अनेक शाळांमधली मुलं त्यांच्या गोष्टींचा आनंद लुटत आहेत.

अजीत नारायण हे व्यावसायिक व्यंगचित्रकार असून अनेक नामवंत प्रकाशनांसाठी गेली १४ वर्ष ते काम करत आहेत. 'स्कोलास्टिक इंडिया' साठी सल्लागार म्हणून काम करताना, सन २००० पासून दिल्लीतल्या आणि इतर ठिकाणच्याही मुलांसाठी व्यंगचित्रकलेवर कार्यशाळा घेत आहेत. 'कार्टूनिंग विथ अजीत नारायण' हे त्यांचं पुस्तक प्रसिद्ध आहे.

एक लांडगा जेव्हा आसरा मागण्याच्या
बहाण्यानं येतो, तेव्हा दोन हुशार आणि
शूर ससे काय करतात बरं?
ही गमतीदार गोष्ट वाचा.

आमच्या वेगवेगळ्या भाषांतील शीर्षकांच्या माहितीसाठी
www.prathambooks.org ला लॉग ऑन करा

आमची पुस्तके इंग्रजी, हिंदी, मराठी, कानडी, गुजराती, बंगाली, तामिळ,
तेलुगु, पंजाबी, उर्दू आणि उडिया या भाषांमध्ये मिळतात.

PRATHAM BOOKS

**प्रथम बुक्स** ही ना-नफा तत्वावर चालणारी संस्था असून, अनेक भारतीय भाषांमध्ये,
लहान मुलांसाठी उत्तम दर्जाची पुस्तके परवडतील अशा किंमतीत प्रसिद्ध करते.

ISBN 978-93-5022-004-7

Age Group: 3-6 years
Tillu Aani Billu (Marathi)
MRP: Rs. 25.00